संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com






● वर्ष : ७ वे ● ● अंक : १०३ वा ● ● शुक्रवार दि. २३ फेब्रुवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025


## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर गेली आहे. या सुनावणीची नवी तारीख ही आता १६ एप्रिल असण्याची शकयता आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुनावणी आता थेट लोकसभा निवडणुकीनंतरच



होण्याची शक्यता आहे.
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि ओबीसी आरक्षणाबाबतची सर्वोच्च न्यायालयातील याचिकेची सुनावणी पुन्हा पुढे ढकलली आहे. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी ९ जानेवारीला होणार होती. त्यानंतर ही सुनावणी ४ मार्चला होणार होती. मात्र त्यापूर्वीच नवी संभाव्य तारीख समोर आली आहे.
सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुनावणीची संभाव्य तारीख १६ एप्रिल दाखवण्यात आली आहे. यापूर्वीही काही वेळा ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली.
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आरक्षणामुळे झालेल्या नाहीत. त्यामुळे लोकसभा लोकसभा निवडणुकीच्या नंतरच निवडणुका झाल्याशिवाय स्थानिक होतील, अशी शक्यता आहे.

## आटपाडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बचत भवन दुरावस्था बाबत बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बचत भवनची अत्यंत दुरावस्था झालेली असून त्याबाबत दिनांक ४ मार्च पासून आटपाडो तहसील कार्यालय येथे बेमुदत आंदोलन व रस्ता रोको चा इशारा आंबेडकरी अनुयायांनी दिला आहे.



आटपाडी : गटविकास अधिकारी यांना निवेदन देताना विलास खरात, यशवंत मोटे, आप्पा खरात, आनंदराव ऐवळे व उपस्थित मान्यवर

आटपाडी येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती मार्फत बचत धामची इमारत बांधण्यात आलेली होती. बचत धाम इमारतीस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बचत भवन आटपाडी असे नामकरण करण्यात आलेले होते. सदर वास्तूमध्ये अनेक शासकीय कार्यक्रम आयोजित करण्यात येत होते. त्यामध्ये शासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका, आमसभा, जनता दरबार, सांस्कृतिक कार्यक्रम, गोर-गरीब लोकांची लग्ने अल्प दरात होत होती. अनेक कार्यक्रम सदरच्या वास्तुत होत होते, परंतु सध्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बचत भवन ही पवित्र वास्तू सध्या अडगळीत पडलेली आहे. सदर वास्तूची दुरावस्था झालेली आहे. दरवाजा, काचा फुटलेल्या आहेत. घाणीचे साम्राज्य झालेले आहे. लाईट नाही. पावसाळ्यात इमारत गळत आहे. रंगरंगोटी नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाची दुरवस्था झालेली आहे.
याबाबत पंचायत समिती आटपाडी यांना लेखी निवेदन देवूनही अद्याप त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सदर पवित्र वास्तूची सत्वर दुरुस्ती करणेत यावी, अन्यथा आम्ही आटपाडी तहसील कार्यालय आटपाडी येथे सोमवारी दिनांक ०४ समरच पासून बेमुदत धरणे आंदोलन, रस्ता रोको, मोर्चा या पद्धतीचे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी विलास खरात, आप्पा खरात, यशवंत मोटे, मोहन खरात, नंदकुमार खरात, शरद मोटे, अशोक लांडगे, आनंदराव ऐवेळे, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. निवेदनाची प्रत जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार, मुख्यकार्यकारी अधिकारी, पोलीस निरीक्षक आटपाडी यांचा देण्यात आलेली आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात निंबवडे नं.२ शाळेचा तृतीय क्रमांक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानामध्ये जिल्हा परिषद शाळा नं.२ निंबवडे या शाळेने तिसरा क्रमांक मिळवला आहे. या स्पर्धेमध्ये या शाळेस एक लाख रुपयेचे पारितोषिक व प्रशास्तिपत्रक शासन स्तरावरून मिळणार आहे.
जिल्हा परिषद शाळा नं.२ निंबवडे ही मुलींची शाळा असून इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतची मॉडेल स्कूल आहे. या शाळेने क्रीडा स्पर्धेत व विविध शालेय स्पर्धेत जिल्हास्तरापर्यंत उत्तुंग यश संपादन केले आहे. या शैक्षणिक वर्षामध्ये नव्याने सुरु झालेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानीमध्ये राज्यातील सर्वच शाळा सहभागी झाल्या होत्या. या अभियानामध्ये शाळेची केंद्रस्तरीय व तालुकास्तरीय ९०० गुणांची विविध पथकांकडून तपासणी केलेली होती. या




आटपाडी : मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तृतीय क्रमांक मिळालेली निंबवडे नं.२ या शाळेतील विदयार्थी व उपस्थित शिक्षक वर्ग

तपासणीमध्ये वर्ग सजावट,शालेय परिसर, शालेय इमारत व परिसराची स्वच्छता, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, भौतिक सुविधा, क्रीडा स्पर्धेतील यश, आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेसाठी राबवलेले विविध उपक्रम, आर्थिक साक्षरता, कौशल्य विकास यासाठी राबवलेले उपक्रम, लोकसहभाग, तंबाखूमुक्त शाळा व प्लास्टिकमुक्त शाळा यासाठी राबवलेले उपक्रम, माजी विद्यार्थी, पालक ,स्थानिक सेवाभावी संस्था यांचा शैक्षणिक देणगीतील सहभाग अशा अनेक मुद्द्यांच्या आधारे मूल्यांकन केले होते.
या सर्वच मुद्यांमध्ये शाळेने अव्वल स्थान पटकावले आहे. खानापूर तालुक्यातून तालुकास्तरीय मूल्यांकनासाठी आलेल्या कमिटीने वरील मुद्द्यांच्या आधारे तपासणी केली. या सर्व अभियानासाठी निंबवडे केंद्राचे केंद्रप्रमुख यशवंत गोडसे व शाळेचे वरिष्ठ मुख्याध्यापक भरत कदम, विषय शिक्षिका विजया तारळेकर, पात्र पदवीधर सचिन देठे, उपशिक्षक शहाजी वाक्षे, विजय चव्हाण, सुनील मिसाळ, सागर नागणे, उपशिक्षिका मोनाली खाडे या सर्वांचे गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय मोरे व मयूर लाडे तसेच शिक्षण विस्तार अधिकारी अशोक म्हेत्रे, जगन्नाथ कोळपे, सुरेश हसबे यांनी अभिनंदन केले. या सर्व अभियानासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रहार अनुसे व सर्व सदस्य तसेच सर्व पालक व निंबबडे गावचे सरपंच बाळासाहेब मोटे व उपसरपंच व सर्व सदस्य (ग्रामपंचायत निंबवडे), माता पालक, शिक्षक पालक, माजी विद्यार्थी संघ शालेय मंत्रिमंडळ, निंबबडे शाळा नं १ सर्व शिक्षक,विद्यार्थी विद्यार्थिनी व सर्व ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले.




## विद्यार्थ्यांनो करिअरच्या नव्या वाटा शोधा : दादासाहेब गुरव

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

**विटा :** भारती विद्यापीठ संचलित, यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालय घोटी बुद्रुक येथे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांचा 'शुभेच्छा समारंभ' संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे डॉ.पतंगराव कदम विद्यालय दौंडज चे माजी मुख्याध्यापक दादासाहेब गुरव विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षणात नव्या वाटा शोधून नवनीवन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. आपल्या आई-वडीलांनी व शिक्षकांनी केलेले कष्ट स्मरण करुन सातत्याने व चिकाटीने आपले ध्येय साकार करावे. भविष्य उज्वल आहे आपण आत्मविश्वासाने ध्येयाकडे वाटचाल करावी.




विटा : डॉ.पतंगराव कदम विद्यालय दौंडज चे माजी मुख्याध्यापक दादासाहेब गुरव विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

मुख्याध्यापक डी.बी.कदम म्हणाले की, भारती विद्यापीठ या ज्ञानगंगेत घडणारा विद्यार्थी हा यशाला गवसणी घालणारा ठरतो. आदरणीय साहेबांचे विचारांची व संस्काराची शिदोरी आपल्याला भविष्यात वेध घेण्याची उर्जा देईल. यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयातील यावर्षीचा निकाल शंभर टक्के लागणार असून आपण सर्वांनी केलेल्या कष्टाचे चिज होईल. आगामी काळात आपण यश खेचून आणाल. विविध पातळीवर स्वतःला सिध्द करा. विद्यालयाचे हे ऋण सदैव अबाधित राहिल असे प्रतिपादन केले.
यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार करत शाळेला भेटवस्तू प्रदान केली. याप्रसंगी शालिवान लोखंडे, बाजीराव प्रज्ञावंत, आंबवडे सर, संजयकुमार कोळेकर, नितीन चंदनशिवे यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तर दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात शाळेच्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांच्या अनुभवातून व आठवणींने वातावरण भावूक झाले.
या प्रसंगी मुख्याध्यापक डी.बी.कदम, शालीवान लोखंडे, बाजीराव प्रज्ञावंत, संजयकुमार कोळेकर, आंबवडे सर, अनिल मगदूम, नितीन चंदनशिवे, मकरंद आमले, एबी पाटील, शब्बीर पटेल आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैष्णवी साळूंखे हिने केले तर आभार कशिश जाधव यांनी मानले. कार्यक्रमाचे आकर्षक सुत्रसंचालन साक्षी सगरे यांनी केले.

## सोलापूर शिवसेना जिल्हाप्रमुखावर गुन्हा दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सोलापूर :** जुनी चारचाकी गाडी खरेदी करून त्यापैकी एक लाख रूपये अनामत रक्कम दिली. आणि विश्वास संपादन करून मोटार नेऊन उर्वरीत तीन लाख रूपये न देता फसवणूक केल्याप्रकरणी शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख मनीष काळजे व त्यांच्या साथीदारांविरूद्ध सोलापुरात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



मनीष काळजे

एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यात मनीष काळे यांच्यासह आकाश मुदगल अशी या गुन्ह्यातील आरोपींची नावे आहेत. विठ्ठल दत्तात्रय मुनगा-पाटील (वय ३९, रा. सृष्टीनगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.
विठ्ठल मुनगा-पाटील यांचा जुन्या चारचाकी मोटारींची विक्री करण्याचा व्यवसाय आहे. ४ जानेवारी रोजी मुनगा-पाटील यांच्या घरी त्यांच्या ओळखीचा आकाश मुदगल आला. त्याने मनीष काळजे यांना जुनी चारचाकी मोटार खरेदी करायची असल्याचे सांगितले. तेव्हा मुनगा-पाटील यांनी त्यांच्या ताब्यात असलेली मोटार (एमएच ०४ एफएन ७८७८) विक्रीसाठी दाखविली असता मनीष काळजे यांनी पसंत केली. मोटारीचा सौदा चार लाख रूपयांत ठरला. काळजे यांनी एक लाख रूपयांची आगाऊ रक्कम दिली. उर्वरीत तीन लाख रूपये देण्यापूर्वीच मुनगा-पाटील यांचा विश्वास संपादन करून त्यांनी मोटार ताब्यात घेऊन वापरण्यासाठी नेली. परंतु खरेदीचे तीन लाख रूपये येणे असलेली रक्कम मागितली असता मनीष काळजे व आकाश मुदगल यांनी मुनगा-पाटील यांना रक्कम न देता किंवा मोटार परत न करता दमदाटी आणि शिवीगाळ करून हुसकावून लावल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## पोलीस असल्याची बतावणी करत लुटणाऱ्या दोघांना अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पोलीस असल्याची बतावणी करत मिरजेतील हातचलाखी करून वृद्ध व्यक्तीची साडेसात तोळे वजनाची सोनसाखळी लंपास करणार्या दोन भुरट्या चोरांना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने गुरूवारी कोल्हापूर रस्त्यावर अंकली फाटा येथे अटक केली असल्याचे पोलीस निरीक्षक सतीश शिंदे यांनी सांगितले.




सांगली : सोनसाखळी चोरणारे चोरटे व तपास करणारे पोलीस अधिकारी व जप्त करण्यात आलेला मुद्देमाल

मिरजेतील छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर रणजितसिंग सुल्ह्यान हे चालले असताना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी अडवून आम्ही पोलीस आहोत, गळ्यातील सोनसाखळी खिशात ठेवा असे सांगत हातचलाखी करून साडेसात तोळ्याची सोनसाखळी लंपास केली होती. याबाबत महात्मा गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे हवालदार सागर लवटे यांना मिळालेल्या माहितीनुसार परजिल्ह्यातील दोघेजण युनिकॉर्न दुचाकीवरून अंकली फाटा येथे येत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे दुचाकीवरून आलेल्या कंबर रहीम मिर्झा (वय ३७) आणि जाफर मुख्तार शेख (वय ३३, दोघेही रा. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे ४ लाख ५० हजार रूपयांची लंपास करण्यात आलेली सोनसाखळी मिळाली. दोघांनाही पोलीसांना अटक केली असून वापरलेली दीड लाख रूपयांची दुचाकीही जप्त केली आहे.

## शिवाजी विद्यापीठाच्या खानापुरातील उपकेंद्रासाठी १०० कोटींच्या तरतूद

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा आदेश : वैभव पाटील यांनी दिली माहिती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा :** शिवाजी विद्यापीठाच्या खानापुरातील उपकेंद्रासाठी १०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद मंजुर करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष वैभव पाटील यांनी आज (दि. २२) दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या आर्थिक तरतुदीचे आदेश दिले आहेत असल्याचे त्यांनी सांगितले.
सांगली जिल्हातील अनेक तालुक्यांना गावांना शिवाजी विद्यापीठाच्या उपकेंद्राचा फायदा होणार असल्याचे वैभव पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सांगितले. यावेळी ते म्हणाले की, खानापूर येथे शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु झाले तर दुष्काळी भागाला न्याय मिळेल शिवाय खानापूरसह आटपाडी, कवठेमहांकाळ, जत, कडेगाव, पलूस, तासगाव आणि माण तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या सोयीचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून खानापूर उपयोगी ठरेल.
यावर अजित पवार यांनी यापूर्वीच उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सचिवांना संबंधित प्रकरण तात्काळ शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून त्वरित मागणी करून घ्यावी व खानापूर येथे हे उपकेंद्र करण्याबाबत कारवाई करा असे निर्देश दिले होते. वैभव पाटील स्वतः सिनेट सदस्य असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये व विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये (व्यवस्थापन परिषदेत) तसा ठराव मंजुरीसाठी विशेष प्रयत्न करून ठराव मंजूर केला होता. त्यानंतर विद्यापीठाच्या पथकाने खानापूर येथे येऊन जागा पाहणीही केली होती. त्यानंतर काल गुरुवारी माजी आमदार सदाशिवराव पाटील आणि वैभव पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबई मंत्रालयात भेट घेतली. यावेळी वैभव पाटील यांनी प्रस्तावानुसार उपकेंद्रासाठी १०० कोटीची आर्थिक तरतुदीची मागणी केली. त्या वर उपमुख्यमंत्री पवार यांनी उपकेंद्रासाठी १०० कोटीची आर्थिक तरतूद मंजुरीसाठीचे तात्काळ आदेश दिले आहेत असे सांगत वैभव पाटील यांनी याबद्दल उपमुख्यमंत्री पवार यांचे विशेष आभार मानले आहेत.

# संपादकीय

## रेडिओच्या आवाजाचा जादुगार

प्रसिद्ध रेडिओ उ निवेदक अमीन सायानी यांनी आपल्या जादूई आवाजाने देश-विदेशातील रेडिओ श्रोत्यांच्या मनावर अनेक दशके अधिराज्य गाजविले. तो काळ असा होता जेव्हा रेडिओशिवाय अन्य कोणतेही मनोरंजनाचे साधन उपलब्ध नव्हते. जगात जे काही घडेल ते कळायचे असेल, कळवायचे असेल, दूरदूरपर्यंत पोहोचवायचे असेल तर रेडिओ हे एकमेव साधन तेव्हा उपलब्ध होते. त्याकाळी रेडिओचे संच काही मोजक्या लोकांकडेच असायचे. त्यामुळे त्यावरून प्रसारित होणारे कार्यक्रम केवळ ऐकण्यासाठी 'जीवाचे कान' करावे लागायचे. अशा दिवसांत एखादा कार्यक्रम केवळ रेडिओवरून प्रसारित होतो आणि देशभरातच नव्हे तर जगभरात प्रचंड लोकप्रिय होतो, तोही ४२ तब्बल वर्षे चालतो आणि यशाचे सर्व विक्रम मोडीत काढतो ही बाब म्हणजे आश्चर्यच म्हणायला हवे.

खरे तर हिंदी सिनेमे त्यातील गाणी तासन् तास ऐकणे हा त्याकाळी लोकांचा आवडता फंडा होता. या अशाच हिंदी लोकप्रिय चित्रपट आणि त्यातील गाण्यांचा कार्यक्रम अनोख्या शैलीत सायानी यांनी तयार केला आणि तो सादर होताच सर्वांना भावला. रेडिओवर वर्षोनुवर्षे चाललेल्या 'बिनाका गीतमाला' या त्यांच्या हिंदी चित्रपट गाण्यांच्या कार्यक्रमाने सर्वांनाच वेड लावले होते. अमीन सायानी हे लोकांना फारसे दिसले नसतील, पण त्यांचा आवाज मात्र घराघरांत पोहोचला होता आणि तो आवाजच सर्वांना आपलासा वाटू लागला होता.

'गीतमाला'मुळे सायानी हे भारतातील सर्वात पहिले होस्ट बनले होते. त्यांनी हा संपूर्ण शो सादर केला व या शोच्या माध्यमातून रेडिओ जगतामध्ये वेगळेच स्थान निर्माण केले होते. रेडिओवर सुरू झालेल्या 'गीतमाला' या कार्यक्रमाने अमीन सायानी यांना प्रसिद्धीची शिखरावर नेऊन ठेवले. 'भाईयों और बहनों' अशी आर्जव करून स्वत:ची आगळी-वेगळी शैली त्या काळात त्यांनी खूप प्रसिद्ध केली आणि ती त्यांची जणू ओळखच बनली होती. 'बिना का गीतमाला' या कार्यक्रमाची सुरुवात ते आपल्या अनोख्या अंदाजात करायचे. १९३२ साली जन्मलेल्या सायानी यांनी इंग्रजी भाषेत निवेदक म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली होती. देश स्वतंत्र झाल्यानंतर त्यांनी हिंदी भाषेत निवेदन करण्यास सुरुवात केली. आपल्या गोड आवाजात आणि सोप्या हिंदी भाषेत निवेदन आणि गाण्यांचे किस्से ऐकवत 'बिनाका गीतमाला' हा कार्यक्रम लोकप्रिय केला. रेडिओवरील सायानी यांची अफाट लोकप्रियता पाहून त्या काळातले मोठ-मोठे, लोकप्रिय सिने अभिनेता आणि अभिनेत्री त्यांच्या या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आसुसलेले असायचे. अशा अनेक कलाकारांच्या त्यांनी रेडिओसाठी मुलाखती घेतलेल्या आहेत. रेडिओ सिलोन आणि विविध भारती चॅनलवरील 'बिनाका गीतमाला' या त्यांच्या कार्यक्रमाने तेव्हाचे लोकप्रियतेचे सर्व मापदंड मोडीत काढले होते. असा हा आवाजाचा अनभिषिक्त सम्राट असा निवेदक पुन्हा होणे नाही.

## शरद पवार गटाला अखेर तुतारी चिन्ह मिळाले

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला केंद्रीय निवडणूक आयोगाने अखेर पक्षचिन्ह दिलं आहे. निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला तुतारी हे पक्षचिन्ह आहे. पक्षाच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून ही माहिती देण्यात आली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षनाव व घड्याळ हे पक्षचिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निकाल निवडणूक आयोगानं दिला होता. त्यानंतर शरद पवार गटाला नेमकं कोणतं नाव किंवा चिन्ह मिळणार? याची उत्सुकता राजकीय वर्तुळात लागून राहिली होती. त्यासाठी शरद पवार गटाकडून तीन नावांचे पर्याय निवडणूक आयोगाला सादर करण्यात आले होते. त्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार असं नाव देण्यात आलं. परंतु, हे नाव येत्या २८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीपुरतं होतं. त्यामुळे या निवडणुकीकरता पक्षाला चिन्ह देण्यात आलं नव्हतं. त्यामुळे हे प्रकरण शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात नेले होते.

सर्वोच्च न्यायालयात नुकत्याच झालेल्या सुनावणीनुसार शरद पवार गटाला चिन्हासाठी निवडणूक आयोगात अर्ज दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसंच, अर्ज दाखल झाल्यानंतर निवडणूक आयोगाने आठवड्याभराच्या आत चिन्हाबाबत निर्णय देण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार, शरद पवार गटाने तीन पर्याय सुचवले होते. परंतु, त्यांनी दिलेल्या पर्यायांपैकी एकही चिन्ह केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलं नाही. तर, निवडणूक आयोगाकडून तुतारी हे चिन्ह देण्यात आलं. सर्वोच्च न्यायालयाकडून पुढील आदेश येईपर्यंत तुतारी हे पक्षचिन्ह शरद पवार गटाकडे राहणार आहे.

# देशातून सिकलसेल आजाराचे उच्चाटन करण्यासाठी वेगाने काम करा - केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार

**मुंबई :** देशातील आरोग्यविषयक पायाभूत सोयी - सुविधा उभारणे, रुग्णसेवा प्रभावी होणे यासाठी केंद्र शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून राज्यांना निधी देण्यात येतो. या निधीच्या विनियोगातून राज्यात आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याचे काम होत आहे. यासोबतच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात सिकलसेल आजाराच्या निर्मूलनाचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार सिकलसेल आजाराचे उच्चाटन करण्यासाठी यंत्रणांनी वेगाने काम करावे, असे निर्देश केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी दिले.

आरोग्य क्षेत्रासाठी केंद्राकडून प्राप्त निधी, विविध योजनांच्या प्रगतीचा आढावा केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. पवार यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत घेतला. बैठकीस केंद्रीय आरोग्य मंत्रालयातील संचालक डॉ. सरोज कुमार, अतिरिक्त आयुक्त डॉ. पवन कुमार, केंद्रीय आरोग्य विभागाच्या लेखा शाखेचे शशांक शर्मा, अप्पर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, आरोग्य सेवा आयुक्त धीरजकुमार, वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, अतिरिक्त संचालक नितीन अंबाडेकर आदी उपस्थित होते.



सिकलसेल रूग्ण, वाहक यांचे निदान होणे गरजेचे असून रूग्णांची तपासणी करून ओळख व्हावी, यासाठी रूग्ण ओळखपत्र वितरण गतीने पूर्ण करण्याच्या सूचना करीत मंत्री डॉ. पवार म्हणाल्या की, ओळखपत्रामध्ये रूग्ण व वाहक असे प्रकार असावे. सिकलसेल निर्मूलनासाठी आदिवासी भागात मोठ्या प्रमाणावर तपासणी वाढविण्यात यावी. गर्भवती महिलांच्या आरोग्य तपासणीमध्ये सिकलसेल आजाराची तपासणी सक्तीची करण्यात यावी. यासोबतच क्षयरोगाच्या उच्चाटनासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात यावी. 'निक्षय मित्र' बनण्यासाठी जनजागृती करून जास्तीत जास्त नागरिकांना यामध्ये जोडण्यात यावे.

राज्यमंत्री डॉ. पवार म्हणाल्या की, प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सोयी सुविधा मिशन अंतर्गत राज्यात प्रयोगशाळांची निर्मिती करण्यात येत आहे. राज्यात चार जिल्ह्यात ही सुविधा निर्माण करण्यात आली आहे. तसेच १८ क्रिटीकल केअर ब्लॉक्सचे कामही करण्यात येत आहे. राज्यामध्ये ११ हजार ५२ आरोग्यवर्धीनी केंद्र असून त्यांना आता आयुष्मान भारत आरोग्य मंदिर करण्यात आले आहे. या ठिकाणी मधुमेह तपासणी, तीन प्रकारच्या कर्करोगाच्या तपासण्या आदी नवीन सुविधा असणार आहेत.

दूरध्वनीवरील आरोग्य सल्ला (टेलिकन्सल्टींग) सुविधेचा राज्यात ६९ लाख रूग्णांनी लाभ घेऊन तज्ज्ञांचा सल्ला घेतला असून त्याचा लाभ रूग्णांना झाला आहे. १५ वा वित्त आयोग, कोविड प्रतिसाद निधी आदींचा आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी उपयोग करण्यात यावा. राज्यात प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे तीन कोटी २६ लाख लाभार्थ्यांचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत या योजनेतून २४ लाख रूग्णांनी लाभ घेतला आहे. या योजनेतंर्गत कार्ड वितरण पूर्ण करण्याच्या सूचनाही यावेळी मंत्री डॉ. पवार यांनी दिल्या.

गुजरात व महाराष्ट्रात किलकारी प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत गरोदर माता व एक वर्षापर्यंतच्या बाळाची काळजी घेण्यात येणार आहे. प्रत्यक्ष संपर्क करून त्यांना आरोग्य सुविधा देण्यात येतील. आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासह देशात वैद्यकीय शिक्षणाच्या जागाही वाढविण्यात आल्या आहेत. नंदूरबार व गोंदीया येथे वैद्यकीय महाविद्यालयांचे काम सुरू आहे. तसेच आरोग्य क्षेत्रात सार्वजनिक खासगी भागीदारी ( पीपीपी) पद्धतीचा उपयोग करण्यात यावा. यामधून चांगले काम होत आहे. कर्करोग निदान व उपचारामध्ये केमोथेरपी केंद्र उघडण्यात यावे. कर्करोगासाठी प्रभावी नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात यावा, असेही केंद्रिय राज्यमंत्री डॉ. पवार यांनी सांगितले.

## अशोक सराफ हे मराठी मातीतील अस्सल हिरा

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** आपल्या अविस्मरणीय भूमिकांनी अष्टपैलू असणाऱ्या अशोक सराफ यांनी प्रेक्षकांची अभिरुची संपन्न केली. अवघ्या महाराष्ट्राला त्यांनी पोट धरुन हसवले. प्रसिद्धीचे इतके वलय मिळूनही त्यांनी कधीही जमीनीशी नातं तोडलं नाही. खऱ्या अर्थाने ते मराठी मातीतील अस्सल हिरा आहेत, अशा भाषेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या कार्याचा गौरव केला.



**मुंबई : अभिनेते अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपस्थित मान्यवर**

मराठी चित्रपटसृष्टी साठी जे जे आवश्यक आहे, त्या सर्व सुविधा राज्यात उपलब्ध करून देण्याचा आणि जगाला हेवा वाटेल अशी फिल्मसिटी आपण तयार करू, असे प्रतिपादन त्यांनी केले.

महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना तर मानाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान आज करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री शिंदे बोलत होते.

याशिवाय, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून अनेक वर्ष योगदान देत रसिकांची व कलासृष्टीची सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा राजकपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात आले. या समारंभास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार मनीषा कायंदे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी मुख्यमंत्री श्री शिंदे, म्हणाले की, अष्टपैलू, हा शब्द ज्याला खऱ्या अर्थाने ज्यांना लागू होतो ते नाव म्हणजे अशोक सराफ आहे. सलग ५० वर्षे असंख्य भूमिका करुनही ज्यांच्यात अभिनयाची आणि नवं काही तरी करून दाखविण्याची त्यांची भूक अजूनही कायम आहे. अशोक सराफ हे वयाचा अमृत महोत्सव साजरा करत असताना राज्य सरकारचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार त्यांना देण्यात येतोय, हा अवघ्या महाराष्ट्रासाठी केवळ अभिमानाचाच नाही तर अमृताहूनही गोड क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या वर्षी ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले आणि ज्येष्ठ निरुपणकार तिर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरवण्याची संधी मला मिळाली. यावर्षी अशोक सराफ यांचा आपण गौरव करत आहोत. त्यांनी त्यांच्या अभिनयाने मराठी रसिकांवर राज्य केले. प्रसिद्धीचे इतके वलय मिळूनही सराफ यांनी कधीही जमीनीशी नातं तोडलं नाही, असे त्यांनी सांगितले. मराठी रसिकांनीही त्यांच्या अभिनयावर भरभरुन प्रेम केले. त्यांच्याप्रमाणेच सुरेश वाडकर यांनी अत्यंत कष्टपूर्वक आपली सांगितीक कारकीर्द उभी केली. मराठी आणि हिंदीच नव्हे तर विविध भाषांतील त्यांची गाणी विशेष गाजली. सुरेशजींचा सुरेल आवाज आजही आपल्याला मंत्रमुग्ध करतो, अशा शब्दात त्यांनी ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांचा गौरव केला.

मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबईतल्या फिल्मसिटीत शुटीगसाठी लागणाऱ्या सर्व अत्याधुनिक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच, मुंबई फिल्मसिटीबाहेर इतर जिल्ह्यात चित्रपटाची शुटींग करायची असेल तर 'वन विंडो सिस्टीम'चा निर्णय सांस्कृतिक विभागाने घेतलाय. या शुटींगसाठी कोणतेही शुल्क घेतले जाणार नाही. राज्यात ७५ नावे चित्र नाट्यगृह उभरण्यासाठी ९ कोटी ३३ लाखाचा निधी मंजूर केला असल्याचे त्यांनी सांगितले.

## मनोज जरांगेंच्या आंदोलनामागे शरद पवारांचा हात : संगीता वानखेडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** अजय महाराज बारसकर यांच्या पाठोपाठ आणखी एका मराठा आंदोलक महिलेने मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्राला वेड्यात काढलं. दंगल का घडली? मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामागे शरद पवारांचा हात आहे असाही दावा संगीता वानखेडेंनी केला. संगीता वानखेडे या मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठा आंदोलनात कार्यरत होत्या. मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर फारकत घेतल्यानंतर संगीता वानखेडेंनी त्यांच्यावर टीका केली आहे आणि आरोप केले आहेत.



मनोज जरांगे



संगीता वानखेडे

महाराष्ट्राला मनोज जरांगेंनी वेड्यात काढलं आहे. त्यांचं सुरुवातीपासून चुकतच आलं आहे. सरकारने दंगल घडली की घडवली त्याचा शोध घेतला पाहिजे. पोलिसांनी जो लाठीचार्ज झाला तेव्हा महाराष्ट्राचा उद्रेक दिसला. मनोज जरांगे पाटील कोण हे आधी मीडियाला माहीत नव्हतं. लाठीचार्ज झाल्यानंतर त्यांना डोक्यावर घेतलं. डॉ. प्रकाश आंबेडकर, राज ठाकरे, उद्धव ठाकरे, शरद पवार सगळे त्यांना भेटले. त्यानंतर मनोज जरांगेंना लोकांनी डोक्यावर घेतलं. त्यामुळेच मी त्यांच्याशी जोडले होते. मनोज जरांगे साधासुधा माणूस, आपल्या भाषेत बोलणारा माणूस म्हणून महाराष्ट्राने आणि मी विश्वास ठेवला होता. मी एक महिन्यापूर्वी पर्यंत त्यांच्यासह होते. पण आता मी त्यांच्यासह नाही.

नामदेवराव जाधव यांच्यावर शाईफेक झाली तेव्हाही मनोज जरांगे यांनी काहीच प्रतिक्रिया दिली नाही. मंगेश साबळे कोण हे माहीत नाही असं सांगितलं. मी या मनोज जरांगेची बाजू घेऊन भुजबळांना ट्रोल केलं. मात्र माझ्याविषयी गलिच्छ भाषा वापरण्यात आली. मी तळतळीने बोलत होते. त्यावेळी मला फोन आले, फेसबुकवर फोन आले. संगीता वानखेडेला एकटी समजू नका इतकंच बोलायचं होतं. मात्र या बाबाचं वक्तव्य होतं की मी त्या बाईला बोलायला सांगितलं नव्हतं. मला ती बाब खटकली, मला तेव्हा खूप मनस्ताप झाला. मी रेकॉर्डिंग ऐकलं आहे त्यामुळे मी हे बोलते आहे. मनोज जरांगेंची गडबड आहे हे मलाही कळत होतं. त्यामुळे मी साथ सोडली. मागच्या दीड महिन्यापासून त्यांचा विरोध करते आहे. मी सोशल मीडियावर आहे. मला उदयनराजेंच्या सहकारी फोन करत आहेत. छत्रपतींची गादी माझ्या पाठीमागे असल्याचे त्या म्हणाल्या.

मनोज जरांगेंनी कुठल्याही पक्षाच्या नेत्याला नीट उत्तर दिलं नाही. शरद पवार जेव्हा भेटायला गेले तेव्हा यांची भाषा बदलली होती. त्यावेळी मला वाटलं होतं मराठ्यांना आरक्षण मिळतंय ना? चांगलं होतं आहे. म्हणून मी साथ दिली. शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांवर हल्ले झाले की हा लगेच गुन्हे मागे घेण्याची मागणी करतो असाही आरोप संगीता वानखेडे यांनी केला. जे शरद पवारांना हवंय तेच या माणसाला पाहिजे आहे. या सगळ्यामागे शरद पवार आहेत. कारण शरद पवारांचा पक्ष संपला आहे. त्यामुळे राडा, गोंधळ आणि राडा घातला जातो आहे. शरद पवारांच्या म्हणण्याप्रमाणेच मनोज जरांगे वागतो असाही आरोप संगीता वानखेडेंनी केला आहे.







दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस

Email - netra7676@gmail.com
डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स्
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११



## गौतम बुद्धांचे विचार संपूर्ण जगाला आव्हाने पेलण्यासाठी उपयोगी - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**मुंबई :** भारत आणि जपानचे ऐतिहासिक काळापासून अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. सिद्धार्थ गौतम बुद्धांच्या विचारातून भारतामध्ये जो विचार निर्माण झाला, त्याचा जगामध्ये प्रसार झाला व लोकप्रिय ठरला. बुद्धांचे तत्वज्ञान व विचार संपूर्ण जगाला आव्हाने पेलण्यासाठी आजही उपयोगी पडत आहेत. जपान अभ्यास दौऱ्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास भेट दिल्यानंतर जपानमध्येही डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा सुरू असल्याचे पाहून मनाला समाधान वाटले, अशी भावना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केली. मुंबईतील जपानचे वाणिज्य



दूतावास जनरल यांनी आयोजित केलेल्या मुंबईतील कार्यक्रमात उपसभापती डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. याप्रसंगी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, अप्पर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, जपानचे राजदूत डॉ. फूकाहोरी यासुकाता आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, जपानमध्ये गुन्ह्यांमधील दोषारोप सिद्धीचा दर हा ९८ टक्के आहे. आपल्याकडील दोषारोप सिद्धीचा दर वाढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जपानच्या सहकार्याने नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यात येत असलेल्या तंत्रज्ञाचा वापर भारतातही होणे आवश्यक आहे. तसेच जपान सरकारने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डॉक्टरेट देऊन सन्मान केल्याबद्दल डॉ. गोऱ्हे यांनी त्यांचे आभार मानले.

जपान दौऱ्यावरून आल्यावर जपान येथील बाजारपेठ राज्यातील उद्योजकांकरिता तसेच राज्यातील बाजारपेठ जपानच्या उद्योजकांना कशा पद्धतीने उपलब्ध करून देता येईल, त्यादृष्टीने विधान भवनात उद्योग विभागाचे अधिकारी तसेच औद्योगिक संस्थांसह बैठक घेतली असून त्याचा पाठपुरावा सुरू असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

## सांगली जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालत ३ मार्च रोजी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगली जिल्ह्यात रविवार, ३ मार्च रोजी जिल्हा न्यायालय सांगली, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, सहकार न्यायालय १, २ व सांगली जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय लोकअदालतमध्ये पक्षकारांनी जास्तीत जास्त प्रकरणे ठेवून तडजोडीने मिटविण्याबाबत लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रविण नरडेले यांनी केले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली व राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. के. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि. ३ मार्च २०२४ रोजी जिल्हा न्यायालय सांगली, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, सहकार न्यायालय १, २ व सांगली जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे (फौजदारी तडजोड प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, बँकेचे दिवाणी दावे, नियमित दिवाणी दावे, भूमि संपादन प्रकरणे, कौटुंबिक वादातील प्रकरणे, चलनक्षम दस्तऐवज (N.I. act 138) प्रकरणे, कामगार न्यायालयातील प्रकरणे व दावापूर्व प्रकरणे (वीज बिल, टेलिफोन बिल, बँकेतील वसुली प्रकरणे)) आदी प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ठेवता येणार आहेत.

## पी.एम.किसान योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी करून घ्या : विवेक कुंभार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी.एम.किसान ) योजनेंतर्गत १६ व्या हप्त्याचे वितरण होणार आहे. लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये सन्मान निधी वर्ग करण्यासाठी लाभार्थ्यांचे बँक खाते आधार संलग्न असणे व e-KYC पूर्ण केलेली असणे गरजेचे आहे. या योजनेंतर्गत प्रलंबित पात्र लाभार्थ्यांनी PMKISSAN app चा उपयोग करून e-KYC प्रमाणीकरण करून घ्यावे आणि बँक खाते आधार संलग्न करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार यांनी केले आहे.

ज्या पात्र खातेदारांचे खाते आधार संलग्न नसेल व e -KYC केलेली नसेल त्यांच्या खात्यावर पी.एम.किसान सन्मान निधी वर्ग होणार नाही. ज्या पात्र खातेदार लाभार्थ्यांचे बँक खात्याशी जोडणी नसेल व e -KYC केलेली नाही अशा लाभार्थ्यांनी आधार जोडणी व e -KYC तात्काळ करून घ्यावी. e-KYC सामाजिक सुविधा केंद्र (CSC) येथून करता येईल आणि ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेत जाऊन खाते आधार संलग्न करावे.

केंद्र शासनाने pmkisan पोर्टलवर फार्मर कॉर्नर (Farmer Corner) मध्ये जढझ आधारे तसेच सामाईक सुविधा केंद्राद्वारे लाभार्थ्यांची e-kyc करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. केंद्र शासनाने विकसित केलेल्या PMKISSAN app मोबाईल वर Face authentication व्दारे पात्र लाभार्थ्यांना e-KYC प्रमाणीकरण करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. या सुविधेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना स्वतःचे e-KYC प्रमाणीकरण आणि इतर ५० लाभार्थ्यांचे सुद्धा e-KYC प्रमाणीकरण करता येणार आहे. सद्यस्थितीत या योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यामध्ये e-KYC प्रमाणीकरण करण्यासाठी ५ हजार २५७ लाभार्थी प्रलंबित आहेत. तसेच आधार बँक खात्याशी जोडणी करण्यासाठी १३ हजार १४५ लाभार्थी प्रलंबित असल्याचे श्री. कुंभार यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## उद्योजकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करा : ज्योती पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांच्या अडीअडचणी जाणून घेवून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. उद्योग वाढीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यास संबधित विभागांनी प्राधान्य द्यावे, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी आज उद्योग मित्र समितीच्या बैठकीत दिल्या.



**सांगली : जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी बैठकीला उपस्थित अधिकारी व उद्योजक**

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक विद्या कुलकर्णी, व्यवस्थापक ऋतुजा नाईकवाडे, महापालिकेचे उपायुक्त राहुल रोकडे, महावितरण कार्यकारी अभियंता श्रीमती एन.ए.अत्तार, एमआयडीसी कार्यकारी अभियंता आय.ए.नाईक, प्रादेशिक अधिकारी वसुंधरा जाधव, उप प्रादेशिक अधिकारी एन.एस.अवताडे, गोविंदराम मराठे औद्योगिक वसाहतीचे पी.व्ही.नेगांधी, मंगेश मिठारी, संतोष भावे, कृष्णा व्हॅली चेंबरचे रमेश अरवाडे, सांगली मिरज एमआयडीसी असोसिएशनचे संजय आरनके, विनोद पाटील, संजय खांबे, अल्फा फौंडी एमआयडीसी मिरजचे यशोधन फडके, असोसिएशन मिरज चे अतुल पाटील यांच्यासह समिती सदस्य, औद्योगिक असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत निर्यात प्रचलन धोरण, आजारी उद्योग पुर्नवसन, स्थानिक लोकांना रोजगार निर्मिती, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आदि समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करून संबधित विभागाना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यामध्ये सीईटी प्लँट, एमआयडीसी क्षेत्रात मुलभूत सुविधा, ईएसआयसी रूग्णालय स्थापित करण्यासाठी भुखंड मिळण्याबाबत, विद्युत पुरवठा, गोंविदराव मराठे औद्योगिक वसाहतीमधील तुटक क्षेत्रास रहदारीकरीता जागा मिळण्याबाबत, एमआयडीसी क्षेत्रात स्पीड ब्रेकर करणे, मिरज एमआयडीसी मधील खोक्यांचे अतिक्रमण काढणे, कुपवाड ते एमआयडीसी पर्यंत असणारे विजेचे पोल व अतिक्रमण काढणे, एमआयडीसी क्षेत्रातील रस्ते व स्ट्रीट लाईट दुरूस्ती, ट्रक टर्मिनल जागा विकसीत करणे, एमआयडीसी मिरज येथे पोलीस चौकी सुरू करणे, वसंतदादा औद्योगिक वसाहतीमधील एच टी लाईन व पॅचवर्क, कुपवाड औद्योगिक वसाहतीमध्ये कचरा डेपो व्यवस्था आदि विषयांवर चर्चा करून संबधित विभागांना आवश्यक कार्यवाहीबाबत सूचना देण्यात आल्या.

औद्योगिक वसाहतीत सुविधांबाबत औद्योगिक संघटनांनी सुचविलेल्या कामांबाबत संबधित विभागांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी बैठकीत दिल्या.

||श्री महालक्ष्मी प्रसन्न|| ||श्री खंडोबा प्रसन्न||
श्री.विनेश बनसोडे Mo.7276137517 9631755757
जय बाळूमामा
टुर्स & ट्रॅव्हल्स
ERTIGA गाडी योग्य दरात भाड्याने मिळेल.
संपर्क- रक्षक गुरुदत्त RO वॉटर
अजय आर्ट्स

स्वच्छ भारत, सुंदर भारत
स्वच्छ घर, सुंदर घर
खुषखबर! खुषखबर!! खुषखबर!!!
आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत...........
माणगंगा
सेफ्टीटँक ड्रेनेज क्लीनिंग सर्व्हिस
आपली संडास टाकी, शोषखड्डा, गोबर गॅस टाकी भरलेली आहे का ......... ?
चिंता करू नका......
फक्त खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर फोन लावा.
आपली संडास टाकी, आधुनिक मशिनच्या सह्याने एकदम वाजवी दरात स्वच्छ करून दिली जाईल.
किरण रणदिवे
7028723789/ 9921030708
टिप :- कृपया फोन करा व जहिरात जपून ठेवा, शेजाऱ्याना उपयोगात येईल.

Dulux let's colour
कलर व त्यासाठी लागणारे सर्व साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण
सिध्दीविनायक कलर एजन्सी
कलरचे माहेरघर...
विजय कालीदास पाटील राहुल कालीदास पाटील
पत्ता
दिघंची रोड जय भवानी बिल्डींग समोर, आटपाडी-शाखा १
दिघंची मायणी रोड दिघंची, शाखा-दिघंची २

## ‘मार्ड’ संघटनेच्या डॉक्टरांचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध - उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई :** मार्ड संघटनेच्या डॉक्टरांचे प्रश्न सुटावेत, यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. त्यामुळेच गेल्या ७ फेब्रुवारीला सेंट्रल मार्ड संघटनेच्या मागण्यांबाबत बैठक घेऊन सर्वमान्य तोडगा काढण्यात आला आहे. त्यानुसार तयार केलेल्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मान्यता आवश्यक आहे. मात्र, या आठवड्यात मंत्रिमंडळ बैठक झाली नसल्याने त्यावर निर्णय होऊ शकला नाही. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या (२५ फेब्रुवारी) मंत्रिमंडळ बैठकीत संबंधित प्रस्ताव मंजूर करण्यात येणार असल्याने मार्ड डॉक्टरांनी संपावर जाऊ नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.



राज्य सरकार मार्ड डॉक्टरांच्या मागण्यांबाबत सकारात्मक असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सेंट्रल मार्ड संघटनेचे अध्यक्ष डॉ. अभिजित हेलगे यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली तसेच वस्तुस्थितीची माहीत दिली. राज्यातील रुग्णसेवा सुरळीत रहावी, रुग्णांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून, मार्डने आज संध्याकाळपासून सुरू होत असलेला त्यांचा संप मागे घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी मार्ड डॉक्टरांना केले आहे.

दि. ७ फेब्रुवारीला मार्ड डॉक्टरांच्या मागण्यासंदर्भात झालेल्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले होते. या बैठकीत राज्यातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची भरीव वाढ करण्यासह त्यांचे विद्यावेतन प्रत्येक महिन्याच्या ठराविक तारखेला नियमितपणे देण्याचा निर्णय झाला होता. विद्यावेतन वाढीसंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्याचे उपमुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाने वसतिगृहांच्या दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावीत. विविध जिल्ह्यांत मंजूर करण्यात आलेल्या वसतिगृहांच्या बांधकामांना गती देण्यात यावी, असे निर्देश देऊन उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले होते की, शासनाने नवीन वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करताना त्याच्या आराखड्यात वसतिगृहाचा समावेश केला आहे. त्यामुळे नवीन महाविद्यालयांमधील डॉक्टरांना पहिल्या दिवसापासूनच चांगल्या दर्जाची वसतिगृहे उपलब्ध होणार आहेत. अस्तित्वातील वसतिगृहांच्या दुरुस्तीसाठीचा निधी वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामाला प्राधान्य देऊन तातडीने दुरुस्तीची कामे सुरु करावीत. त्यात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही.

राज्यातील निवासी डॉक्टरांच्या वसतिगृहांची तातडीने दुरुस्ती करावी. वसतिगृहांच्या दुरुस्तीदरम्यान विद्यार्थ्यांना इतर ठिकाणी राहण्याची व्यवस्था करणे गरजेचे असते. मात्र, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयांच्या परिसरात पर्यायी मोकळ्या खोल्या मिळण्यात अडचणी येतात. अशा वेळी गरजेच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना भाड्याने खोल्या घेऊन राहता येण्यासाठी ठराविक भाडे देण्यात यावे. शक्य असेल त्याठिकाणी त्यांना पर्यायी खोल्या उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या होत्या.

# मोठ्या आर्थिक व्यवहारावर बारकाईने लक्ष ठेवा : डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने निवडणूक कालावधती संबंधित यंत्रणांनी बँकेतील खात्यावरून होणाऱ्या मोठ्या आर्थिक व्यवहारावर बारकाईने लक्ष ठेवावे.तसेच रेल्वे पार्सल, कुरिअर, चेक पोस्ट आदी ठिकाणी सुक्ष्म तपासणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी यांनी दिले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने खर्च नियंत्रण करणे व खर्च संवेदनशिल भागांमध्ये करावयाच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने संबंधित नोडल अधिकाऱ्यांसमवेत जिल्हाधिकारी कार्यालयातील एनआयसी हॉल येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस पोलीस अधिक्षक संदीप घुगे, अप्पर आयकर आयुक्त पियुश सिन्हा, उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता सावंत-शिंदे, जिल्हा परिषद मुख्य वित्त व लेखाधिकारी विठ्ठल चव्हाण, राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक बजरंग पाटील, उप आयुक्त जीएसटी अतुल औंधकर, जिल्हा पुरवठा अधिकारी आशिष बारकुल, जिल्हा कोषागार अधिकारी रमेश लिधडे, राज्यकर उपायुक्त सुनिल कानगुडे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापवक विश्वास वेताळ आदी उपस्थित होते.



**सांगली : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने खर्च नियंत्रण करणे व खर्च संवेदनशिल भागांमध्ये करावयाच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या उपस्थित बैठक संपन्न झाली.**

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी म्हणाले, आयकर, पोलीस, बँक, जीएसटी, राज्य उत्पादन शुल्क, आरटीओ आदी यंत्रणांनी समन्वयाने काम करून संबंधित यंत्रणाबरोबर माहितीची देवाणघेवाण करावी. खर्च संवेदनशिल भागांमध्ये फ्लाईंग स्कॉड, स्टॅटिक सर्व्हिलन्स टीम्स, व्हिडिओ सर्व्हिलन्स टीम्स आदी नियुक्त पथकांमार्फत २४७ निगराणी ठेवावी. निवडणूक कालावधीत कायदेशीर आर्थिक व्यवहार करणाऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली. उत्पादन शुल्क, जीएसटी, आयकर विभागांनी केलेल्या कारवाईची अनुषंगाने पोलीस प्रशासनास अवगत करावे. तसेच कारवाईबाबत सर्व विभागांनी आपआपसात समन्वय ठेवावा, अशी सूचना पोलीस अधिक्षक संदीप घुगे यांनी केली. या बैठकीसाठी दूरदृष्यप्रणालीव्दारे उपविभागीय अधिकारी मिरज, कडेगाव, विटा, जत तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# कु.साक्षी इळगेर हिची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणुन निवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** राजे रामराव महाविद्यालय,जत येथिल राष्ट्रीय छात्र सेना, शारीरिक शिक्षण व इंग्रजी विभागाची विद्यार्थिनी कु.साक्षी सतिश इळगेर हिची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणुन निवड झाली आहे. तिच्या ह्या निवडीबद्दल राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांनी तिचा सत्कार करुन अभिनंदन केले.



**जत : कु.साक्षी इळगेर हिची भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणुन निवड झाल्याबद्दल तिचे अभिनंदन करताना राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील सोबत प्राध्यापक वृंद व विद्यार्थी**

कु.साक्षी ही मूळची नागज, ता. कवठेमहांकाळ, येथील असून तिच्या लहानपणीच आई-वडीलांचे निधन झाले आहे. अनाथ झाल्याने जत येथील भगिनी निवेदिता मुलींचे बालग्रह या ठिकाणी तिचे संगोपन व १२ वी पर्यंतचे शिक्षण झाले. सध्या ती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, जत येथे राहते. कु.साक्षी ही राजे रामराव महाविद्यालयात बी.ए भाग दोनमध्ये शिकत आहे. शिक्षण घेत असतानाच ती महाविद्यालयातील विविध स्पर्धा, खेळ, राष्ट्रीय छात्र सेना इत्यादी मध्ये सहभाग नोंदवत होती. अथक प्रयत्न व प्रामाणिक कष्ट यामुळेच तीची भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून भरती झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी असेल तर यश मिळते असे उद्गार राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांनी व्यक्त केले.

कु.साक्षीने सुरुवातीला भरती परीक्षा दिली. त्यानंतर घेण्यात आलेल्या शारीरिक चाचणीत ती उत्तीर्ण झाली. त्यानंतर कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया व मेडिकल झाले. या सर्व टप्प्यातील कामगिरी पाहून अंतिम गुणवत्ता यादी तयार केली गेली, आणि त्यानुसार तिची अग्निवीर जनरल ड्युटीसाठी निवड झाली आहे. पुणे विभागातून एकुण चार विद्यार्थ्यांनीची निवड झाली असून त्यापैकी कु.साक्षी हिची अव्वलस्थानी निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल १६ महाराष्ट्र बटालियन सांगलीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल चंद्रशेखर साठे, डम ऑफिसर कर्नल अभिजीत बर्वे, कॅप्टन प्रा.पांडूरंग सावंत, सुभेदार मेजर सर्जेराव जाधव व सर्व पीआय स्टाफ तसेच राजे रामराव महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंदानी व विद्यार्थी विद्यार्थीनींनी तिचे अभिनंदन करुन भावी कामगिरीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# लक्ष्मण मोहिते यांच्या 'घुसमट' कादंबरीचा सन्मान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


**म्हसवड/प्रतिनिधी :** फलटण येथे साहित्यप्रेमी सेवाभावी फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय पर्यावरणस्नेही युवा स्पंदन साहित्य संमेलनात लक्ष्मण मोहिते यांना त्यांच्या 'घुसमट'कादंबरी साठी राज्यस्तरीय माणगंगा साहित्यप्रेमी गौरव पुरकाराने संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ विचारवंत प्राचार्य रवींद्र येवले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



**म्हसवड : संमेलनाध्यक्ष प्राचार्य रवींद्र येवले,अरविंद मेहता,सुगम शहा,प्रदीप कांबळे प्रा ताराचंद आवळे,सत्कार मूर्ती लक्ष्मण मोहिते**

लक्ष्मण मोहिते यांचे आतापर्यंत 'सर्वोत्तमता, मैत्री, माझ्या गावाची माणसं, गावकी व तू माझी होणार ना आदी ललित व कथा संग्रह आदी मराठी साहित्य प्रकाशित झाले आहे. त्याच बरोबर स्पर्धा परीक्षेसाठी 'इंग्रजी ग्रामर व कंपोसिशन, आणि स्पोकन इंग्लिश स्किल्स आदी पुस्तकंही प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या 'मेंढका' कथानकास या पूर्वी भोरचा 'सह्याद्री भूषण' पुरस्कार मिळाला होता. त्यांच्या साहित्य लेखनात घुसमट ही कादंबरी एक वेगळ्या धाटणीची साहित्यकृती म्हणून ओळखली जाते.

साहित्य संमेलन पुरस्कार वितरण प्रसंगी संमेलन अध्यक्ष जेष्ठ विचारवंत रवींद्र येवले यांच्या सह राज्य साहित्य मंडळ व संस्कृती मंडळ मुंबई सदस्य रवींद्र बेडकिहाळ, अरविंद मेहता, विभागीय वन अधिकारी हरिश्चंद्र वाघमोडे, कृषी तज्ज्ञ सुगम शहा, जत्राकार सुरेश शिंदे, जेष्ठ साहित्यिक आनंदा ननावरे, जेष्ठ कवी प्रदीप कांबळे, रमेश आढाव, नियत वन क्षेत्र अधिकारी राहुल निकम व साहित्य संमेलनाचे आयोजक साहित्यिक ताराचंद आवळे आदी मान्यवर उपस्थित होती.







# भटक्या विमुक्त जाती -जमातीतील नागरिकांना मिळणार आधार कार्ड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरिकांना जन्म दाखला, आधारकार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, आयुष्यमान भारत आरोग्य पत्रिका देण्याबाबत कार्यवाही करावी. या समाजातील नागरिकांना आधारकार्ड देण्याबाबत महिनाभरात प्राधान्यक्रमाने शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, असे निर्देश महसूल, पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय विकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत दिले.

भटक्या विमुक्त जातीतील नागरिकांना विविध प्रमाणपत्रे देण्यासंदर्भात इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मंत्रालयात बैठक झाली. याप्रसंगी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रफुल्ल ठाकूर आणि भटके विमुक्त विकास परिषदेचे पदाधिकारी हजर होते. तसेच सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी आणि इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी मंत्री श्री. सावे म्हणाले, भटक्या विमुक्त जातीतील नागरिकांना विविध दाखले व प्रमाणपत्र मिळण्यासाठी विविध शासकीय विभागांमार्फत निर्देश झालेले आहेत.

या समाजातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यासाठी प्रामुख्याने जन्म दाखला, आधारकार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, आयुष्यमान भारत आरोग्य पत्रिका, जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र यांची गरज असते ते मिळताना विविध समस्या व अडचणींचा सामना करावा लागतो. हे टाळण्यासाठी बैठकीत चर्चा करण्यात आली.

भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरीकांना आधार कार्ड देण्याबाबत माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) यांनी क्षेत्रिय स्तरावर सुचना दिलेल्या आहेत तसेच या अनुषंगाने विशेष मोहिम राबविण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरीकांना शिधापत्रिकाचे वितरण व्हावे यासाठी विशेष मोहिम राबविण्याकरिता अन्न व नागरी पुरवठा विभागाने कार्यवाही सुरू केली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने आयुष्यमान भारत कार्ड व सामाजिक न्याय विभागाने जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती यावेळी दिली.







